# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**शेणगांव (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(१) ५६ (२५-०३-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेणगांव (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील किसन सानप या शेतकऱ्याने तहसिलदार, जिवती यांनी शेतीच्या मालकी हक्क प्रकरणी एकतर्फी निर्णय दिल्यामुळे नैराश्यातून दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी तहसिलदाराच्या दालनात विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतीच्या मालकी हक्क प्रकरणी तहसिलदारांनी एकतर्फी निर्णय घेण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२७-०८-२०२०) :** (१), (२) व (३) शेणगाव (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील श्री. किसन सानप या शेतकऱ्याचे तहसिलदार, जिवती यांचेकडे त्यांच्या मालकी हक्काचे प्रकरण प्रलंबित नसल्याने एकतर्फी निर्णय देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

मात्र शांतता व सुव्यवस्था अबादित राखणेसाठी प्रतिबंधात्मक कारवाई म्हणुन C.R.P.C.१९७३ चे कलम १०७ नुसार सुरु असणाऱ्या सुनावणी दरम्यान श्री किसन दादाराव सानप या व्यक्तीने काळ्या रंगाचा पदार्थ असणारी पुढी सेवन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्या वैद्यकीय तपासणीमध्ये त्यांनी विष प्राशन केल्याचे समोर आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तहसिल कार्यालयाकडून दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले प्रलंबित असल्याबाबत

**(२) ७६ (२७-०३-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तहसिल कार्यालयाकडून दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले प्रलंबित असल्याने विद्यार्थी तसेच जनतेची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती मिळण्यासाठी लागणारे दाखले सादर करण्याची मुदत संपत आली असतानाही विद्यार्थ्यांना अदयाप दाखले न मिळाल्याने पालकांमधून नाराजी व्यक्त होत असून याबाबत शासनाकडे अनेकदा तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून विद्यार्थी तसेच जनतेला विहित मुदतीत दाखले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०८-२०२०) :** (१) व (२) राजापूर तालुक्यातील नागरिकांना उत्पन्नाचे दाखले हे शैक्षणिक कामकाजासाठी आवश्यक असल्याने तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून कार्यालयात विशेष पथके नेमून सदर दाखले विहित कालावधीत निर्गमित करुन देण्यात आलेले आहेत.

माहे जून, २०१९ ते माहे जानेवारी, २०२० या कालावधीमध्ये प्रलंबित असलेल्या १६५ प्रकरणामधील त्रुटींची पूर्तता करुन सदर अर्जदारांना माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये दाखले निर्गमित करण्यात आले आहेत. माहे जून, २०१९ ते माहे मे, २०२० पर्यंत उत्पन्नाचे दाखले प्रलंबित नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड महसुल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) २७८ (१४-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात महसुल विभागातील उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, लिपीक इत्यादी १३६ पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांची कामे वेळेत करताना अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे एका कर्मचा-यावर अतिरिक्त कार्यभार सोपवल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून नागरिकांना उत्तम सेवा देण्यासाठी रायगड जिल्हयातील महसूल विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०) :** (१), (२) व (३) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | ४३ | ३८ | ०५ |
| २ | ब | ७४ | ५५ | १९ |
| ३ | क | ६०५ | ४९४ | १११ |
| एकूण | | ७२२ | ५८७ | १३५ |

मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल असलेली अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ प्रलंबित असून सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार तुर्तास पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहेत.

रायगड जिल्हयातील महसूल विभागातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात येवून नागरिकांची कामे विहित वेळेत व कालावधीत पुर्ण केली जात असल्यामुळे नागरिकांची कोणतीही गैरसोय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जेएनयू हल्ल्याच्या निषेधार्थ गेट वे ऑफ इंडिया येथे केलेल्या आंदोलनाबाबत

**(४) १२५० (२२-०३-२०२०). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेएनयू हल्ल्याच्या निषेधार्थ दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे आंदोलन करणाऱ्या आंदोलकांसह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांविरुध्द कुलाबा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच आंदोलना दरम्यान "फ्री काश्मीर" असा झेंडा फडकविणाऱ्या मेहक मिर्झा प्रभू या तरुणीविरुध्द १५३-बी अन्वये कुलाबा पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१५-०७-२०२०) :** (१) नाही.
(२), (३) व (४) होय. आंदोलना दरम्यान "फ्री काश्मीर" असा झेंडा फडकविणाऱ्या मेहक मिर्झा प्रभू या तरुणीविरुध्द कुलाबा पो.ठाणे येथे गु.र.क्र.०८/२०, कलम १५३(ब) भादंवि अन्वे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीने चौकशीमध्ये दिलेले स्पष्टीकरण व इतर बाबींची पडताळणी करण्यात येत असून सदर गुन्ह्याबाबतचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळदुर्ग (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) या नवीन तालुक्याची निर्मिती करण्यायाबाबत**

**(५) १३२३ (२२-०३-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नळदुर्ग (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील नळदुर्ग गावास वैभवशाली इतिहास असल्यामुळे नळदुर्ग तालुक्याची निर्मिती करण्याची मागणी करून त्यासाठी जन आंदोलनेही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याचा प्रस्तावसुद्धा शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील दोन्ही प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२०) :** (१) नळदुर्ग तालुक्याची निर्मिती करण्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेले आहे.
(२) नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयाच्या दि.१६.०९.२०१९ व ११.१०.२०१९ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.
(३) तालुका निर्मिती ही एक मोठी प्रशासकीय व आर्थिक प्रक्रिया आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे. तर नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गीकेसाठी संपादित केलेल्या जमिनींबाबत**

**(६) १४४० (२२-०३-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नाऱ्हेन, करवले, पाली, उसाटणे व चिरड (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील जमीनी विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका विकसित करण्यासाठी संपादीत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण गावामधील शेतकऱ्यांच्या जमिनीचा शासनाच्या नवीन धोरणानुसार देण्यात येणारा मोबदला बाजार मुल्यापेक्षा कमी असल्यामुळे या भूसंपादनाला स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून स्थानिक लोकप्रतीनिधिनी याबाबत वेळोवेळी शेतकऱ्यांच्या वतीने संबधित भूसंपादन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास सदरहू बाब आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गिकेसाठी जमिन संपादीत केल्यानंतर उर्वरित आजूबाजूची जमीन नापिक व विकसित करणे योग्य राहणार नसल्याने आजूबाजूच्या जमीनी संपादीत करण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अशी बाब नाही.

(४) या प्रकरणी जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेल्या दराबाबत विरोध दर्शवून शेतकऱ्यांनी वाढीव दर देण्याची विनंती दि. १५.२.२०२० रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची दि. २४.२.२०२० रोजी बैठक घेऊन वाढीव दराबाबत निर्णय घेण्यास्तव महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि. ६.३.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निमकोहळा, पो. पोरज (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील**
**शेतकऱ्याला भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत**

**(७) १४९९ (२२-०३-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमकोहळा, पो. पोरज (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील शेतकरी शालीग्राम नामदेव चिमनकर यांना निमकोहळा येथील गट नं. २२६ क्षेत्र ९४ आर पैकी ०.२१ आरमध्ये लावलेल्या फळबागेचा मोबदला मिळाला नसल्याची तक्रार दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजी च्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २१ (१) (४) च्या चौकशीच्या अंतर्गत भूसंपादन अधिकारी यांचेकडे प्राप्त आक्षेपावरील पूर्तता अनुपालन अहवालामध्ये श्री.शालीग्राम नामदेव चिमनकर यांच्या गट नं.२२६ क्षेत्र ०.९४ आर पैकी संपादनाखालील ०.२१ आर मध्ये कोणतेही फळझाडे नाहीत असा अभिप्राय नोंदविण्यात आला असल्याने फळझाडांचा मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच या प्रकरणी अंतिम निवाडा पारीत केला असल्यामुळे नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ६४ नुसार संबंधित भूधारक वाढीव मोबदल्याकरीता प्राधिकरणाकडे अपिल अर्ज दाखल करू शकतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आटपाडी (जि.सांगली) येथे वाळू चोरी प्रकरणी जप्त केलेली वाहने सडत असल्याबाबत**

**(८) १५३१ (२२-०३-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) येथे वाळू चोरी प्रकरणी महसूल विभागाने केलेल्या कारवाईमध्ये जप्त केलेली वाहने व वाळू शासकीय गोदाम , तहसिल कार्यालय व पोलिस ठाण्यात पडून असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही वाहने सडत चालली असून वाळूच्या ढिगा-यावर झाडे उगवली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कारवाईमध्ये आतापर्यंत किती दंडाची वसूली झाली आहे व उर्वरित दंडाची वसूली करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,याबाबतची सद्यःस्थिती काय आहे
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१), (२) व (३) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करतांना पकडण्यात आलेल्या वाहनांच्या वाहनधारकांनी दंडाची रक्कम शासनजमा न केल्यामुळे वाहने वाळूसह जप्त करण्यात आली आहेत. आटपाडी येथील शासकीय धान्य गोदाम व तहसिल कार्यालयाच्या आवारात ठेवण्यात आलेल्या जप्त वाहनांपैकी काही जुन्या वाहनांना गंज लागल्याचे तसेच वाळूच्या ढिगाऱ्यावर तूरळक गवत उगवल्याचे दिसून आले आहे. तसेच जप्त वाहनांच्या लिलावप्रक्रियेसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली

यांच्याकडून वाहनांचे मुल्यांकन करुन घेणे व कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

आटपाडी तालुक्यामध्ये मागील तीन वर्षापासून जप्त असलेली एकूण ८५ वाहने असून माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी,२०२० या कालावधीत एकूण रु.१६,०४,६३०/- इतक्या दंडात्मक रक्कमेची वसूली करण्यात आली आहे. तसेच ५८.८९ ब्रास वाळूच्या लिलावामधून रु.३,२६,४०१/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव शहर व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसिलदाराची नेमणुक करण्याबाबत**

**(९) १८६७ (२२-०३-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहराचा वाढता विस्तार पाहता जळगाव शहरी भागासाठी स्वतंत्र तहसिलदार व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसिलदार मिळण्याकरिता वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे तसेच तहसिल इमारत जीर्ण झाली असून नवीन इमारत बांधण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात डीएसो ऑफीस (प्रांत) पुरवठा यांनी स्वतंत्र तहसिलदार मिळावा यासाठी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०८-२०२०) :**(१) होय.

(२) (३) व (४) जळगाव शहराकरीता स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

जळगांव तहसिल कार्यालयाची इमारत जुनी झाली असुन सदर इमारत कामकाजासाठी अपुरी पडत असल्याने, तहसिल कार्यालय जळगांव करीता नवीन इमारत बांधकामासाठी जळगांव शहर येथील सि.स.नं.१९७५ मधील ५०००चौ.मी. जागा वर्ग करण्यात आली असून सार्वजनिक बांधकाम विभागास नवीन तहसिल इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील जुने दस्तावेज गहाळ झाल्याबाबत**

**(१०) २१४३ (२२-०३-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेख कक्षातील सन १९१६ ते १९६० या कालावधीतील जन्म आणि जमिनीशी संबधित जुने दस्तावेज गहाळ झाल्याचे तसेच काही दस्तऐवजना वाळवी लागली असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दस्तावेज सन २०१५ मध्ये स्थानिक प्रशासनाने स्कॅनिंग करून जतन करून ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु तांत्रिक अडचणींमुळे तो असफल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील जुने दस्तावेज जतन करण्याबाबत खबरदारीच्या कोणत्या उपाययोजना सुरु करण्यात आल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेख कक्षातील जुने ऐवज गहाळ झाल्याचे तसेच काही दस्तऐवजांना वाळवी लागली असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच, सदर दस्तऐवज स्थानिक प्रशासनाने स्कॅनिंग करुन जतन करण्यासाठी मे. माऊली इंटरप्रायजेस यांना सदर स्कॅनिंगचे काम देण्यात आले होते. सदर एजंसीने विहीत मुदतीत स्कॅनिंगचे काम पुर्ण न करता, कोणतीही सुचना न देता साहीत्यासह निघून गेल्याने, करारनाम्यातील अट क्र.१६ अन्वये काम मध्येच सोडून गेल्याने सदर अटीचा भंग झाला असल्याने, सदर एजंसीने जमा केलेली अनामत रक्कम रुपये २,५०,०००/- शासन जमा करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत स्कॅनिंगच्या कामाकरीता देण्यात आलेला अभिलेख विस्कळीत झाल्याने क्रमवार पृष्ठ लावून योग्यरित्या केसेसची बांधणी करण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आले असून सदर कामाचा आढावाही घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा कालभैरव पेठ (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील फेरफाराचे प्रकरण प्रलंबित असल्याबाबत

**(११) २७५२ (२२-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा कालभैरव पेठ (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील श्री. महादेव श्रावण मेश्राम आणि इतर यांनी दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास आवश्यक दस्तावेजांसह तहसील कार्यालय, पारशिवनी, जि. नागपूर येथे वारसान फेरफाराचे प्रकरण दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २ वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही सदर प्रकरण प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे २ वेळा तक्रार केल्यानंतर तहसीलदार, पारशिवनी यांना दि. १६ नोव्हेंबर, २०१७ व दि. २४ जुलै, २०१८ रोजी कार्यालयीन पत्रान्वये नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच दि. २० जानेवारी, २०२० रोजी लोकप्रतिनिधीच्या पत्रान्वयेदेखील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वारसान फेरफार, नमुना ७/१२ वरून नावाची नोंद कमी करणे, संगणकीकृत ७/१२ करणे व इतर प्रकरणे पूर्ण करण्याकरिता शासनाने कालावधी ठरवून दिल्यावरही कार्यवाही पूर्ण न करण्या-या अधिका-यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०८-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजा कालभैरव पेठ (ता.पारशिवनी जि.नागपूर) येथील श्री. महादेव श्रावण मेश्राम आणि इतर यांनी आवश्यक दस्ताऐवजासह तहसील कार्यालय, पारशिवणी जि. नागपूर येथे वारसान फेरफाराचे प्रकरण दाखल केले होतो. त्यानूसार तत्कालीन तलाठी श्री. देवते यांनी वारस फेरफाराबाबत नोंद घेतली, परंतु फेरफार प्रमाणीत करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे संबंधीत मंडळ अधिकारी यांचेकडे सादर केली नसल्याने मंडळ अधिकारी यांनी वारसान नोंद नामंजुर करुन अर्जदाराकडुन नविन अर्ज मागवुन नोंद घ्यावे असा शेरा नोंदविला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच, विधानसभा सदस्य, (रामटेक) यांच्या पत्राच्या अनुषंगाने तहसिलदार पारशिवणी यांनी तलाठी यांना नियमानूसार कार्यवाहीबाबत निर्देश दिले होते. तत्कालीन तलाठी हे दुसरीकडे नोकरी लागल्याने तलाठी पदाचा राजीनामा दिला आहे. वारसान फेरफाराच्या प्रकरणांत प्रथम दोषी म्हणून तत्कालीन तलाठी यांना तहसिलदार पारशिवणी यांनी दिनांक ५/२/२०२०, २/६/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु त्यांच्याकडून खुलासा अप्राप्त आहे. त्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच प्रकरणांत द्वितीय दोषी म्हणून श्री. आर.डी. घुडे, मंडळ अधिकारी, नवेगांव खैरी यांची एक वर्षाकरिता एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येवून याबाबत सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. अर्जदार यांचे अर्जाचे अनुषंगाने वारसान नोंद घेतलेली असुन दिनांक २४/०२/२०२० रोजी सदरहू नोंद प्रमाणित करण्यात आली. सुधारीत ७/१२ अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

**राज्यातील पोलिस पाटलांना मानधन देण्याबाबत**

**(१२) २८९१ (२२-०३-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली व परभणी जिल्हयासह राज्यातील पोलिस पाटीलांचे मानधन गत चार महिन्यांपासून थकल्याचे माहे डिसेंबर,२०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिस पाटलांचे मानधन थकल्यामुळे त्यांच्यावर उपासामारीची वेळ ओढावलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिस पाटीलांचे मानधन रखडण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
व त्यानुसार तातडीने पोलिस पाटलांचे मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) होय.

तथापि, राज्यातील कार्यरत पोलीस पाटील यांच्या वाढीव मानधनापोटी पुरवणी मागणी द्वारे रु.१०७.१९ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करण्यात आली, सदर निधी सर्व पोलीस घटकांना वितरीत करण्यात आलेला असून थकीत मानधन फेब्रुवारी २०२० अखेरपर्यंत अदा करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) या प्रकरणी मंत्रिमंडळ उपसमितीने दि.०१.०३.२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये पोलीस पाटील यांच्या मानधनात रु.३,०००/- वरुन रु.६,५००/- इतकी वाढ करण्यात आली.

त्यानुसार शासन निर्णय क्र. बिव्हिपी-०८१८/ प्र.क्र.९५/पोल-८, दि.०८.०३.२०१९ निर्गमित करण्यात आला. पोलीस पाटील यांची सदरची मानधनवाढ दि. १.४.२०१९ पासून लागू करण्यात आली.

वाढीव मानधनामुळे सन २०१९-२०२० साठी अर्थसंकल्पीय तरतूद अपूरी पडली. त्यामुळे मुळ मंजूर निधीतून केवळ एप्रिल २०१९ ते सप्टेंबर-२०१९ पर्यत सहा महिन्याचे वाढीव मानधन अदा करण्यात आले उर्वरित माहे ऑक्टोबर-२०१९ ते मार्च २०२० पर्यत वाढीव मानधासाठी रक्कम रु.१०७,१९,२८,०००/- ची आवश्यकता होती. त्याकरिता अतिरिक्त निधीसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रक्कम मंजूर करुन घेण्यात आली. सदरची रक्कम पोलीस पाटील यांचे थकीत वाढीव मानधन देण्याकरिता पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सर्व पोलीस घटकांना वितरीत करण्यात आली असून पोलीस पाटील यांना थकीत मानधन फेब्रुवारी २०२० अखेरपर्यत अदा करण्यात आले आहे.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील घरकुलांची कामे बंद असल्याबाबत**

**(१३) ३३४४ (२२-०३-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील विविध योजनेतील ५४४ घरकुलांची साडेसहा कोटीची कामे रेती उपलब्ध नसल्याने गेल्या चार महिन्यापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरील घरकूलांची कामे तातडीने सुरु होण्याकरिता रेती उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२५-०८-२०२०) :** (१), (२) व (३) उमरखेड पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी व कोलम आवास योजनेअंतर्गत एकूण ४३२१ घरकुलांच्या कामांना मंजूरी देण्यात आली होती. त्यापैकी उमरखेड तालुक्यात वाळूघाटांचे लिलाव न झाल्याने बांधकामासाठी वाळू उपलब्ध नसल्यामुळे ३८० घरकुलांचे बांधकाम बंद आहे.

सन २०२०-२१ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ३२ वाळूघाटांसाठी जनसुनावणी घेण्यात आली असून पर्यावरण अनुमतीसाठी सदर वाळूघाटांचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावित वाळूघाटांना पर्यावरण अनुमती प्राप्त होताच वाळूघाटांची लिलाव प्रक्रिया व घरकुलासाठी वाळू उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच अवैध वाळूसाठे जप्त प्रकरणातील वाळू घरकुल लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी उपविभागीय अधिकारी व तहसिलदारांना दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) ३४८४ (२२-०३-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात ३०० पेक्षा अधिक पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) होय.
(२) गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत उपविभागीय स्तरावर कार्यवाही करण्यात आली परंतु पदे रिक्त असण्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

i. ब-याच ठिकाणी नक्षल्यांकडून पोलीस पाटलांची हत्या करण्यात आल्याने उमेदवार उपलब्ध झाले नाही.

ii. शासन नियमाप्रमाणे परिक्षेत उमेदवार पात्र झाले नाही.

iii. जाहिरनामा प्रसिध्द करुनही अर्ज प्राप्त झाले नाही.

सदयस्थितीत वित्त विभागाचे शासन निर्णय क्र. -अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३,दि. ४ मे, २०२० अन्वये राज्यामध्ये कोविड-१९ संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेत्तर उत्पन्नातील अपेक्षित महलूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेऊन, उपाययोजना म्हणून पदभरती व बदली बाबत सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी विभाग वगळता इतर कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये. असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यत सद्यस्थितीत गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करता येणार नाही.

शासनाचे पुढील आदेशानंतर पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा सुसुन्द्रा (ता.कारंजा, जि.वाशीम) येथे सन १९९८-१९९९ मध्ये शेतीचे प्रख्यापन चुकीचे झाल्याबाबत**

**(१५) ३५४३ (२३-०३-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सुसुन्द्रा (ता.कारंजा, जि.वाशीम) येथे सन १९९८-१९९९ मध्ये शेतीचे प्रख्यापन चुकीचे झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीच्या झालेल्या प्रख्यापनामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२७-०८-२०२०) :** (१), (२) व (३) ता.कारंजा जि.वर्धा येथील १२१ या सर्व गावाचे येथे सन १९९८-९९ मध्ये शेतीचे प्रख्यापन पूर्ण झालेले आहे. शासनाची पुनर्मोजणी योजना राबविण्यात येऊन मौजा सुसुन्द्रा या गावाचे रितसर प्रख्यापन दिनांक २४.०४.१९९९ रोजी झालेले आहे. परंतु सदर गावामध्ये उक्त अभिलेख सन २०१४ पर्यंत प्रत्यक्षात अंमलात न येता, ब्रिटीश कालीन सन १८९०-९१ च्या दरम्यान झालेला बंदोबस्त अभिलेखाप्रमाणे अंमल केला जात असे. सन २०१४ मध्ये संगणिकृत उपक्रमणानुसार पूनर्मोजणी अभिलेखाप्रमाणे ७/१२ संगणिकृत करण्यात आलेले असून पुनर्मोजणी अभिलेख सध्या अंमलात आलेला आहे.

सन २०१८ मध्ये त्रुटी असलेल्या अभिलेखाच्या दुरूस्तीकामी विशेष मोहीम राबवून त्यानुसार प्राप्त झालेल्या ३२ अर्जांपैकी १८ दुरुस्त्या झाल्या होत्या व इतर १४ प्रकरणांमध्ये किरकोळ दुरूस्ती संभवत असल्यानूसार कार्यवाही करण्यात आलेली असून सदर प्रकरणांमध्ये कार्यवाही पूर्ण झाल्याचे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी नमुद केले आहे. तसेच सदर प्रकरणातील प्रचलित ७/१२ तहसिलदार कारंजा यांच्याकडून पुरविण्यात येत आहे.
तद्नंतर शेतकऱ्यांनी विविध योजनेकरिता अर्ज केल्यास नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

---

**माथेरान मिनी ट्रेनच्या शटलसाठी जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) ३६४४ (२३-०३-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान मिनी ट्रेनच्या कायमस्वरुपी देखभालीसाठी शटल उभारण्यासाठी घाटमाथ्यावरील जमिनीची रेल्वे प्रशासनाने जिल्हाधिका-यांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमन लॉज ते माथेरान अशा शटल सेवेसाठी आवश्यक असलेली जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०८-२०२०) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अधीक्षक माथेरान यांनी वरिष्ठ सहा. मंडळ अभियंता (ट्रॅक) मध्य रेल्वे, कल्याण यांच्यासह स्थळपाहणी करणेबाबत वारंवार विनंती करुनही रेल्वे प्रशासनाकडून अद्याप प्रतिसाद अप्राप्त आहे. तसेच मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांनीही कार पार्किंग विकसीत करणेकरिता विषयांकित जमिनीची मागणी केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुसरबीड (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) हे बेकायदेशीर गुटखा व मावा विक्रीचे केंद्र बनल्याबाबत**

**(१७) ३६४६ (२५-०३-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुसरबीड (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) हे बेकायदेशीर गुटखा व मावा विक्रीचे केंद्र बनले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत संबधितांकडे स्थानिकांनी तक्रार करुनही कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, या बेकायदेशीर गुटखा, मावा विक्री संदर्भात शासन काय कारवाई करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२०-०८-२०२०) :** (१) नाही.

उप विभाग देऊळगांव राजा अंतर्गत पो. स्टे. किनगांव राजा हद्दीत दुसरबीड गाव राज्य महामार्गावर येत असल्याने रोडवरील पान टपरीवर बेकायदेशीर गुटखा विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक पोलीसांनी जानेवारी २०२० मध्ये अवैधरित्या गुटखा मावा विक्री करणाऱ्या ३ इसमांविरुध्द कारवाई करुन १९,२८० रुपयाचा गुटखा जप्त करुन केलेल्या कारवाईची माहिती संबंधीत अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा या कार्यालयास दिलेली आहे.
(२) नाही.
(३) सन २०१६ मध्ये एक व्यक्तीविरुध्द कारवाई करुन ७,२०० रुपयाचा गुटखा जप्त करण्यात आला तसेच सन २०१८ मध्ये ३ व्यक्तींविरुध्द कारवाई करुन ४४,६४२ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. लपून छपून अवैध रित्या गुटखा, मावा विक्री करणाऱ्यांवर मिळालेल्या माहितीच्या आधारे वारंवार कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) परिसरात अवैध व्यवसाय चालू असल्याबाबत

**(१८) ३६६८ (२३-०३-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) राष्ट्रीय महामार्गावर आदिवासी समाज व इतर ५२ गावांची कायदा व सुव्यव्यवस्थेची जबाबदारी असलेले वडकी पोलिस स्टेशन परिसरामधून खैरी मार्गे चंद्रपूर जिल्हयात दारू पुरवली जात असल्याचे आणि उमरविहीर येथे कोंबड बाजार व वाढोण,खैरी व वेडसी या गावांमध्ये मटका पटटी हा अवैध व्यवसाय चालु असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरत ऑनलाईन लॉटरीच्या नावावर वरली मटका जुगार अवैध प्रमाणात सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन याकडे दुर्लक्ष करित असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी २०२० मध्ये एकही केस उघडकीस आलेली नाही.

तथापि सन २०१९ मध्ये वडकी पोलीस स्टेशन अंतर्गत खैरी परिसरात अवैध दारु वाहतूक संदर्भात २१ केसेस महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये करण्यात आला असून त्यात ३,०८,२४१ रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन २७ आरोपी विरुध्द गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

मौजा उमरविहीर येथे सन २०१९ व जानेवारी २०२० मध्ये कोंबड बाजार ची एकही घटना उघडकीस आलेली नाही.

तसेच मौजा वाढोणा, खैरी व वेडसी या गावात सन २०१९ मध्ये अवैध वरली मटका जुगाराच्या १८ केसेस दाखल झाल्या आहेत. त्यात आरोपीकडून १९,८३२ रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन व जानेवारी २०२० मध्ये ३ केसेस करुन आरोपींकडून २६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन सन २०१९ मध्ये महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये २२ आरोपींविरुध्द व जानेवारी २०२० मध्ये ३ आरोपींविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

वडकी पोलीस स्टेशन परिसरात ऑनलाईन लॉटरीच्या शासन मान्य दोन दुकाने असून ऑनलाईन लॉटरीच्या नावाने मटका जुगार सुरु असल्याचे आढळून आलेले नाही.

(३) वडकी पोलीसांनी अवैध व्यवसायाविरुध्द वेळोवेळी आवश्यक कायदेशीर कारवाई केलेली असून दुर्लक्ष झालेले आढळून आलेले नाही. त्यामुळे कोणत्याही आधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यात स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत

**(१९) ३६९२ (१४-०३-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरु करणेबाबतची अधिसूचना शासनाने दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी काढली असून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यत यावर आक्षेप व हरकती मागविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एकही आक्षेप वा हरकत शासनास प्राप्त झाली नसून देखील हे कार्यालय सुरु करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-०८-२०२०) :** (१) होय.

(२), (३) व (४) दौंड (जि.पुणे) तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरू करणेबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मात्र दरम्यानच्या कालावधीत विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने व सदर आचारसंहिता दि.२७ ऑक्टोबर, २०२० रोजी संपल्यानंतर हरकती व सूचना घेणेकामी खुपच कमी कालावधी मिळत असल्याने, सदर अधिसूचनेस प्रसिद्धी देऊन हरकती व सूचना घेणेकामी वाढीव कालावधी मिळणेबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी शासनास कळविले आहे.

त्यानुसार सुधारीत अधिसूचना निर्गमित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

---

**पुणे शहरातील व्यावसायिकाचा अपहरण करून खून केल्याबाबत**

**(२०) ३९६० (२३-०३-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील लक्ष्मी रस्त्यावरील नामांकित शुज शोरुमचे मालक श्री.चंदन कृपादास शेवानी यांचे २ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबियांनी बंड गार्डन पोलीस ठाण्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.चंदन कृपादास शेवानी यांचा मृतदेह दिनांक ०५ जानेवारी, २०२० रोजी पाडेगांव येथील कॅनॉल परिसरात आढळून आल्याने स्थानिक नागरीकांनी याबाबत लोणंद पोलीसांना माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीसांनी तपास केल्यानंतर मृत व्यक्तिची छातीत गोळ्या झाडून तीक्ष्ण हत्याराने वार करुन हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर व्यावसायीकाचे अपहरण करुन खून करणाऱ्या गुन्हेगांराना पोलीसांनी अटक केली आहे काय,

(५) नसल्यास, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२०-०८-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, डोक्यात लोखंडी कानस मारुन गंभीर जखमी करुन पिस्टल (अग्निशस्त्र) ने गोळ्या झाडून खुन केलेला आहे.

(४) होय, सर्व ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(५) गुन्ह्याचा तपास चालू आहे.

---

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील खंडकरी शेतकरी जमीन वाटप गैरप्रकाराबाबत**

**(२१) ४०५४ (२३-०३-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप झाल्यानंतर खंडकरी शेतकऱ्यांचे प्लॉट बदलून देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती खंडकरी शेतकऱ्यांचे प्लॉट बदलले गेले आहेत व अनुचित लाभ मिळण्याच्या हेतूने गैरव्यवहार करून बदल करण्यात आलेल्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,

(३) तसेच बिल्डर खंडकरी शेतकऱ्यांकडून अवैधपणे खंडकरी शेतकऱ्यांचे वाटप केलेले क्षेत्रफळ विकण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कारवाई करण्यात येत आहे अथवा येणार आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१४-०७-२०२०) :** (१), (२) व (३) श्रीरामपूर तालुक्यातील टिळकनगर व हरेगाव मळयातील पात्र माजी खंडकरी शेतकरी यांना जमीन वाटपाचे अधिकार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या अधिनस्त असलेले समिती प्रमुख तथा उप विभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या समितीस आहेत. दोन्ही मळयातील एकूण २४ पात्र माजी खंडकऱ्यांना जमीन बदलून दिलेली आहे. तथापि, अनुचित लाभ मिळण्याच्या हेतुने गैरव्यवहार करून बदल करण्यात आलेला आहे असे दिसून आलेले नाही. तसेच अशा तक्रारी देखील प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेती महामंडळ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२२) ४०५५ (२५-०३-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतन आयोग, पगार फरक, रोजंदारी, कामगार उपदान, बोनस, प्रलंबीत पगार तसेच जमिन मिळणेबाबतची मागणी प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती महामंडळ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबीत मागण्यांबाबत मंत्रालयस्तरावर बैठाका घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०७-२०२०) :** (१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ (मर्या.), पुणे यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा नियमानुसार देय पगार फरक, रोजंदरी, कामगार उपदान, बोनस, इ. सदर कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले असल्याने देणे प्रलंबित नाही.

सदर कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत शेती महामंडळाने शासनास सादर केलेला प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सूरु आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामगार/कर्मचाऱ्यांच्या जमीन मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ मध्ये सदर कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा व कसण्यासाठी शेती महामंडळाची जमीन देण्याची तरतूद नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मळयावरील काही प्रातिनिधीक कामगार संघटनानी आणि कामगार लढा कृती समिती यांनी शेती महामंडळाची ५ एकर जमीन व राहण्यासाठी २ गुंठे जागा मिळावी म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली असून ती न्यायप्रविष्ठ आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळातील कामगारांच्या प्रलंबित असलेल्या प्रश्नावर महामंडळाने/शासनाने नियमानुसार कार्यवाही केलेली आहे तसेच ६ वा वेतन आयोग लागू करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडीत शेतकरी जमिन वाटपाबाबत**

**(२३) ४०५९ (२५-०३-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिटिश राजवटीमध्ये श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने आकारी पडीत म्हणून घेतलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासन स्तरावर संबंधित आकारी पडीत शेतकऱ्यांच्या वारसांना त्यांच्या जमिनी वाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०१९ अखेर किती शेतकऱ्यांना जमिन वाटप करण्यात आली व किती शेतकऱ्यांना जमिन वाटप करणे बाकी आहे,

(४) असल्यास, उर्वरित शेतकऱ्यांना आकारी पडीत जमिनेचे वाटप कधी करण्यात येणार आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१४-०७-२०२०) :** (१) ते (४) अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील १) वडाळा महादेव, २) मुठेवाडगाव, ३) माळवाडगाव, ४) खानापूर, ५) ब्राम्हणगाव वेताळ, ६) शिरसगाव, ७) उंदीरगाव, ८) निमगाव, ९) खैरीगाव अशा एकूण ९ गावाचे मिळून ४०९ गट असून ७,३७७.१२ एकर गुंठे इतकी शेतजमीन सन १९१८ मध्ये दि बॉम्बे गर्व्हनरमेंट गॅझेट १/०८/१९१८ अन्वये तत्कालीन भु-संपादन कायदा, १८९४ चे कलम ६ (१) नुसार तत्कालीन मुंबई सरकारने अधिसूचना काढून ताब्यात घेतलेले आहे.

सदर जमिनी या संपादीत जमिनी असल्याने या जमिनींना महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २८ -१अअ मधील तरतूदी लागू होत नाहीत. त्यामुळे सदर जमिनी वाटप करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तहसिल कार्यालयाचे विभाजन करुन नवीन तहसिलदार व नायब तहसिलदार कार्यालय निर्माण करण्याबाबत**

**(२४) ४३८१ (२५-०३-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील वाढत्या नागरीकरणामुळे सन २०११ च्या जनगणनेनुसार असलेली २४ लाख ३५ हजाराची लोकसंख्या आता ३५ लाखांवर पोहोचली असुनसुद्धा हवेली तालुक्याला एकच तहसलिदार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली शहर व ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे १ लाख ८० हजारांच्या आसपास असुन तेथे एक तहसिलदार काम करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवेली तालुक्यातील नागरीकांची अनेक कामे रखडली असून महसूल विभागासह इतर विभागांवर कामाचा ताण मोठया प्रमाणावर येत असल्याने तहसिल कार्यालयाचे विभाजन करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून हवेली तहसिल कार्यालयाचे विभाजन करुन नवीन तहसिलदार व नायब तहसिलदार कार्यालय निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वाढते शहरीकरण तसेच वाढत्या प्रशासकीय कामकाजामूळे शासन निर्णय क्र. प्राफेब-२०१०/व्हीआयपी २७७/ पुनर्बांधणी ३/ प्र.क्र. १५१/म-१०, दि. ८.०२.२०१३ अन्वये हवेली तालुक्यांतर्गत अपर तहसिलदार कार्यालय, पिंपरी- चिंचवड स्थापन करण्यास यापुर्वी मान्यता देण्यात आली आहे. सदर कार्यालयाकरीता १ अप्पर तहसिलदार पदासह एकूण १३ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

तसेच पुणे महानगरपालिका हद्दीतील हवेली तालुक्यात पश्चिम हवेली येथे स्वतंत्र अप्पर तहसिलदार कार्यालय सुरू करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**होनसळ (ता.उत्तर सोलापूर) येथील जमीन गैरव्यव्हाराबाबत**

**(२५) ४५०२ (२५-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होनसळ (ता.जि.सोलापूर) येथील सुरेखा साबळे यांनी गुरु सिद्धय्या स्वामी आणि जगदेवी स्वामी या दाम्पत्याकडून गट नं-१६३/१/अ/२/क क्षेत्र ३ हेक्टर जमीन विकत घेतली परंतु साबळे यांची ३ हेक्टर जमीनच गायब झाली असून कसलाही पत्रव्यवहार न करता ही जमीन तिसऱ्यालाच विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.विकास तळभंडारे यांनी या जमिनीची महसूल प्रशासनातील तलाठी, सर्कल ऑफिसर, तहसिलदार यांच्या सहकार्याने बनावट कागदपत्रे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल प्रशासनाच्या मदतीनेच एकच जमीन अनेकांना विकण्यात येत असल्याने शासनामार्फत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-०८-२०२०) :** (१) मौजे होनसळ (ता.उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर) येथील श्रीमती सुरेखा साबळे यांनी श्री.गुरु सिध्दय्या स्वामी आणि श्रीमती जगदेवी स्वामी दाम्पत्याकडून गट नंबर १६३/१/अ/२/क क्षेत्र ३ हेक्टर जमीन विकत घेतल्याबाबत कोणतीही फेरफार नोंद मौजे होनसळचे मूळ फेरफार नोंदवहीत आढळून येत नाही. तसेच श्रीमती सुरेखा साबळे यांनी ३.०० हेक्टर जमीन विकत घेतल्याबाबत त्यांचे नावे कोणताही गा. न. नं.७/१२

अधिकार अभिलेख तयार झालेला नाही. त्यामुळे श्रीमती सुरेखा साबळे यांचे नावे जमीन झाल्यानंतर अथवा गा. न. नं.७/१२ तयार झाल्यानंतर सदर जमीन गायब झालेली आहे हे खरे नाही. जमिनीचा खरेदी विक्री व्यवहार होताना कोणताही पत्रव्यवहार महसूल यंत्रणेमार्फत होत नाही. त्यामुळे पत्रव्यवहार न करता विकली गेली हे खरे नाही.

(२) मौजे होनसळ गट नंबर १६३/१/अ/२/क क्षेत्र ३.०० हे. ही जमीन श्री.विकास संभाजी तळभंडारे यांनी दिनांक १३/०५/२०१० रोजी खरेदीने घेतलीबाबत फेरफार क्र.१२९७ अन्वये फेरफार नोंदवहीत नोंद घेतली आहे. सदरची जमीन सन २०१० ते २०१७ पर्यंत श्री.विकास तळभंडारे यांचे नावे असलेबाबत महसूली दप्तरी नोंद आहे. श्री.गुरुसिध्दय्या स्वामी व जगदेवी स्वामी किंवा श्रीमती सुरेखा साबळे यांच्या नावाची नोंद मौजे होनसळ येथील गट नंबर १६३/१/अ/२/क या जमिनीचे अधिकार अभिलेख नोंदवहीत आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्याबाबत**

**(२६) ४६६४ (२४-०३-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांचा दररोज दीड तास वाहतूक कोंडीमुळे वाया जात असल्याची धक्कादायक माहिती नुकत्याच एका अहवालातून स्पष्ट झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्याकरिता शासनाने कोणत्या नविन उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याकरीता खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• मुंबई शहरातील वाहतूक सर्व महत्वाच्या जंक्शनवर वाहतूक नियमन व नियंत्रणासाठी वाहतुक अंमलदार व अधिकारी यांची नेमणूक करण्यात येते.

• वाहतूकीस अडथळा करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी कर्षित वाहनांची मदत घेण्यात येते.

• प्रवाशांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त वापर करावा याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच ती सक्षम करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे

• मुंबई शहरातील महत्वाच्या १२५० चौकापैकी ८२२ चौकात वाहतूक नियंत्रणासाठी वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत.

• मुंबई शहरातील रस्त्यावर थर्मोप्लास्टीक रोड मार्किंग करून घेण्यात आले आहे.

• मुंबईतील विविध रस्त्यावर वाहतूकीस अडथळा होऊ नये याकरीता एकूण ८७ 'पे ॲन्ड पार्क' तयार करण्यात आले आहेत.

• मुबंईत सदयस्थित मेट्रो प्रकल्पाची कामे मोठ्याप्रमाणत प्रगतीपथावर असल्याने भविष्यात वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

• दि.२३.०१.२०१८ रोजीच्या अधिसुचनेअन्वये वाहतूक कोंडी टाळण्याकरीता जड वाहनांना बंदी घालण्यात आलेली आहे.

• मुंबईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरुध्द कारवाई करण्याकरीता शहरात ६००० सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत

• मुंबईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरुध्द नियमानुसार देडात्मंक कांरावाई करण्यात येते.

उपरोक्त उपाययोजना व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार अन्य उपाययोजना देखिल करण्यात येत आहेत.

---

**पुणे शहरात केल्या जाणाऱ्या विकासकामांना वाहतूक पोलिसांकडून जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात असल्याबाबत**

**(२७) ४६६७ (२५-०३-२०२०). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात केल्या जाणाऱ्या विकासकामांना वाहतूक पोलिसांकडून जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक पोलिसांनी अंतर्गत असलेल्या गल्ली बोळातील कामात पण जिथे वाहतूक अडचण होत नाही तिथे पण अडथळा आणून चार ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधीत वाहतूक पोलिसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) तथापी, वाहतूक पोलीसांकडून केवळ वाहतूकी संदर्भात नियम व अटींचा भंग केल्यास विकास कामे करणाऱ्या संबंधीत ठेकेदारा विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतात.

वाहतूक शाखेकडून देण्यात आलेल्या ना-हरकत परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने मे. काशिनाथ सिताराम कुमावत यांच्याविरुध्द भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन सी.आर.नं. ३५/२०२०दि.०७.०१.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मे.मोतीलाल धुत यांच्याविरूध्द डेक्कन पोलिस स्टेशन सी.आर.न.०२/२०२० दि.०४.०१.२०२० तसेच शिवाजीनगर पोलिस स्टेशन सी.आर.नं.०२/२०२० दि.०३.०१.२०२० व ६७/२०२० दि.२३.०१.२०२० असे तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

संबंधीत ठेकेदाराविरुध्द नोदविण्यात आलेले फौजदारी गुन्हे अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे चौकशी अंती व प्राप्त माहितीच्या आधारे नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहतूक पोलीसानी केलेली कार्यवाही कायदेशिर असल्याने त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिरोडा (जि.गोंदिया) येथील तहसीलदाराच्या गैरहजेरीमुळे विद्यार्थी, शिक्षक, पालकांची होत असलेली गैरसोय**

**(२८) ४६८० (२५-०३-२०२०). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) येथील तहसीलदार सतत गैरहजर राहत असल्यामुळे विद्यार्थी व पालकांना विविध प्रमाणपत्राकरिता एक एक महिना प्रतीक्षा करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०८-२०२०) :** (१) व (२) तहसीलदार, तिरोडा हे दररोज कार्यालयात उपस्थित राहत असून त्यांचेकडून विविध प्रमाणपत्र विहित वेळेत निर्गमित केले जातात. तसेच, तिरोडा तालुक्यातील ३३ गावातील शाळा व कॉलेजमध्ये महाराजस्व अभियान अंतर्गत विविध प्रमाणपत्र वाटपाचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात आली असून विविध प्रमाणपत्र विहित मुदतीत निर्गमित करण्यात आली आहेत.

तसेच ऑनलाईनद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये विहित केलेल्या कालावधीच्या आत प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यात महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी यांच्यासह अनेक रिक्त पदे भरणेबाबत**

**(२९) ४८०८ (२५-०३-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड आणि आंबेजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी पदे रिक्त असून सदर ठिकाणी दोन्ही पदावर प्रभारी अधिकारी काम करीत आहेत. तसेच उपजिल्हाधिकारी यांची पदेही रिक्त असल्याने या पदावरही प्रभारी अधिकारी काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,बीड जिल्हयातील नायब तहसीलदारांची १४ पदे रिक्त असून अव्वल कारकून २०, मंडळाधिकारी ९, लिपिक ५९, तलाठी ६७, वाहनचालक ७, लघुलेखक ४ आणि शिपायांची ३१ अशी सर्व मिळून २११ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार किती रिक्त पदे भरली वा भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) बीड जिल्हयातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील बीड व अंबेजोगाई येथील पदे दि.३०.०४.२०२० अन्वये भरण्यात आली आहेत. तसेच उपजिल्हाधिकारी संवर्गातील दोन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

बीड जिल्हयातील अन्य संवर्गातील रिक्त पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | ३० | २८ | ०२ |
| २ | ब | ५६ | ४१ | १५ |
| ३ | क | ८६९ | ७०७ | १६२ |
| ४ | ड | १५७ | ११४ | ४३ |
| एकूण | | १११२ | ८९० | २२२ |

सदर रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या कोट्यातील मागास प्रवर्गातील तसेच अव्वल कारकून १०, मंडळ अधिकारी ११, लिपिक २७ व शिपाई संवर्गातील २१ अशी एकून ६९ पदे, पदोन्नतीस पात्र कर्मचारी उपलब्ध न झाल्याने रिक्त आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल असलेली अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ प्रलंबित असून सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार तुर्तास पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील घाटा खालील सहा तालुक्यांचा मिळून नवीन खामगांव जिल्हा निर्माण करण्याबाबत

**(३०) ५१६९ (२५-०३-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील घाटाखालील सहा तालुक्यांचा मिळून स्वतंत्र खामगांव जिल्हा करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हयाबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समितीची नेमणूक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलढाणा जिल्हाचे विभाजन करून खामगांव जिल्हयाची निर्मिती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-०८-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी दि.२४.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून अत्यंत क्लिष्ट व खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जानेफळ (जि.बुलढाणा) परिसरातील उटी येथे विधानसभा सदस्य श्री.संजय रायमुलकर यांच्या गाडीचा झालेला अपघात

**(३१) ५३०७ (२५-०३-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जानेफळ (जि.बुलढाणा) परिसरातील उटी येथे विधानसभा सदस्य श्री.संजय रायमुलकर यांच्या गाडीला दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास टक्कर देणा-या रेती तस्कराच्या मेटॅडोर गाडीच्या पुढे-मागे वेगवेगळे नंबर असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिमेंट रस्त्याला रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या चिरा बुजविण्याच्या हेतूने रस्त्याच्या कंत्राटदाराने दगड लावून एक बाजू बंद केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघातास कारणीभूत असणा-या रस्त्याचा कंत्राटदार व रेती तस्काराविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर गाडीचा मागील नंबर प्लेटवरील नंबर हा एम.एच.२३-बी-६७१६ व पुढील नंबर प्लेटवरील नंबर हा एम.एच.-२८-एच-९८०१ असा होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वाहनचालक गणेश तुकाराम राऊत अवैधरित्या रेती चोरुन वाहतूक करत असताना अपघात झाला असल्याने वाहन चालका विरुध्द पोलिस स्टेशन जानेफळ, येथे मध्ये दि.११.०१.२०२०

रोजी अप क्र.८/२० क २७९,३३७,३३८ भादवि सहकलम १३४,१८४ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला अहे पुढील तपास सुरु आहे.

त्याशिवाय मंडळ अधिकारी नायगांव, दत्तापूर यांनी संबंधीत वाहान चालका विरुध्द रेतीची चोरी/तस्करी प्रकरणी पोलिस स्टेशन जानफळ येथे दि.११.०१.२०२० येथे अप क्र.९/२० कलम ३७९ भा.द.वि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदर गाडीचा पुढील व पाठीमागचा क्रमांक वेगळा असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा यांच्याकडून सदर वाहन काळ्या यादीत टाकण्यात आले आहे तसेच वाहन चालकास करणेदाखवा नोटीस बजावण्यात आली असुन नियमानुसार दंडाची रक्म भरल्याशिवाय वाहन मुक्त न करण्याच्या सुचना पोलिस स्टेशन जानेफळ याना देण्यात आलेले आहेत.

कंत्राटदाराने सदर रसत्यावर दगड लावून एक बाजू बंद केली होती परंतु कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे रेडियम अथवा दिशादर्शक फलक लावले नव्हते यास्तव आपघातास कारणीभूत असलेल्या संबधीत कंत्राटदाराविरुध्द कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे प्राप्त अभिप्रायाअंती पोलिस स्टेशन जामफळे यांच्या कडून पुढील कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) शहरातील बसस्थानक चौकातील बेशिस्त थांब्यामुळे अपघात होत असल्याबाबत**

**(३२) ५३१४ (२५-०३-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) शहरातील बसस्थानक चौकात ट्रॅव्हल्स, ॲपेरिक्षा, मिनिडोअर, मॅक्स, जीप या गाडयांच्या बेशिस्त थांब्यामुळे पादचारी तसेच दुचाकी वाहनांना मार्गक्रमण करण्यास अडचणी येऊन अनेक वेळा छोटे-मोठे अपघात होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध वाहतुकीस स्थानिक पोलिस स्टेशनचा अर्थपूर्ण वरदहस्त असल्याचा आरोप तेथील नागरिक करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने अवैध वाहतूकीला प्रतिबंध घालण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तथापी, अशा प्रकरणी अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाविरूध्द व चालकाविरूध्द मोटार वाहन अधिनियम १९८८च्या विहित तरतूदीनुसार वाहतूक पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येते.

पादचारी व नागरिकांना सुरळीत मार्गक्रमण करण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अशी कोणतीही तक्रर पोलीस विभागास प्राप्त झालेली नही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) अवैध वाहतूकीस प्रतिबंध घालण्याकरीता मोटार वाहन अधिनियमांतर्गत महागाव बस स्थानक परिसरात सन २०१८ मध्ये वाहण चालका विरुध्द एकूण २११ व सन २०१९ मध्ये ५४३ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

---

**बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती करण्याबाबत**

**(३३) ५८९२ (२७-०३-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई हा नवीन जिल्हा निर्माण करण्याबाबत मागणी मागील २५ वर्षापासून होत असून त्यासाठी आक्रमक आंदोलने या भागाच्या तत्कालीन आमदार स्वर्गीय डॉ. विमलताई मुंदडा यांनी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून अंबाजोगाई जिल्हयाची निर्मितीचा प्रश्न रखडला असून महाराष्ट्र राज्यातील २२ जिल्हयांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावास मंजुरी देऊन बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०८-२०२०) :** (१) बीड जिल्हयाचे विभाजन करून अंबाजोगाई हा नवीन जिल्हा करण्याबाबत विविध संघटना तसेच मान्यवर नागरीक यांची निवेदने प्राप्त आहेत.

(२), (३) व (४) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्हयांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने जिल्हा विभाजन/निर्मिती संदर्भात अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून अत्यंत क्लिष्ट व खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागाव (जि.यवतमाळ) शहरासह तालुक्यात गुटख्याची विक्री होत असल्याबाबत**

**(३४) ५९२० (२७-०३-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) शहरासह तालुक्यात फुलसावंगी, हिवरा, गुंज, सावना, मुडाणा इत्यादी गावात खुलेआम वरळी मटका व गुटख्याची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध व्यावसायिकांवर वचक ठेवण्यासाठी महागाव तालुक्यापुरते स्वतंत्र स्थानिक गुन्हे शाखेचे पथक स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) तसेच या अवैध धंदयाना आळा घालण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी २०२० मध्ये वरली मटक्यावर टाकलेल्या धाडीत ९ केसेस दाखल करण्यात आल्या असून १५ आरोपींना अटक करुन १,९०,५५५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध गुटख्यासंदर्भात एकही गुन्हा दाखल नाही.

(२) स्वतंत्र स्थानिक गुन्हे शाखेचे पथक स्थापन करण्याची मागणी करणारा कोणताही अर्ज या कार्यालयास प्राप्त नाही. तसेच यवतमाळ जिल्हा स्तरावर स्थानिक गुन्हे शाखा कार्यरत असून सदर शाखा ही पूर्ण जिल्ह्यात कार्यान्वीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) अवैध धंद्यावर आळा घालण्यासाठी वेळोवेळी माहिती काढून त्या आधारे छापे टाकून प्रचलीत कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात येते. तसेच असे अवैध धंदे करणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई सुध्दा करण्यात येते.

---

**पौड (ता.मुळशी, जि.पुणे) येथे तहसिल कार्यालय व उपकोषगार कार्यालयाची इमारत बांधण्याबाबत**

**(३५) ५९९५ (२७-०३-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील पौड येथील तहसिल कार्यालय व उपकोषागार कार्यालयाच्या इमारत बांधकामास १५ कोटी रुपयांचा निधी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्राच्या अनुषंगाने सदरील कामास रु.१५ कोटी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३०-०७-२०२०) :** (१) व (२) मौजे पौंड, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे तहसिल कार्यालयाची इमारत बांधकामाचे प्रस्ताव या कार्यासनास प्राप्त झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.

उपकोषागार कार्यालयाच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव विभागीय सहसंचालक, पुणे यांचेकडून वित्त विभागास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विम्को कंपनीस देण्यात आलेल्या जमिनीच्या गैरव्यव्हाराबाबत**

**(३६) ६२१५ (२७-०३-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विम्को कंपनीस शासनामार्फत देण्यात आलेल्या जमिनीचे शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण आय.टी.सी.लिमिटेड व मातोश्री डेव्हलपर्स यांना केल्याने विम्को कंपनीने शर्तभंग करत शासनाचा महसूल बुडविल्याप्रकरणी संबधितावर कारवाई करण्यात यावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी महसूल प्रशासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन हस्तांतरणामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडाला असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अद्याप पर्यंत सदर जमीन विकणारे व विकत घेणाऱ्या विरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच या प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१८-०६-२०२०) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) मौजे कोहोज-खुंटवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील विम्को कंपनीकडून आय. टी. सी. कंपनी यांचेकडे विनापरवाना हस्तांतरीत झालेल्या एकूण क्षेत्र ७२८९५.१० चौ.मी. क्षेत्राबाबत मूळ विक्रीच्या किंमतीच्या ७५% अनर्जित रक्कम रु.४१,००,३४,९३८/- इतकी रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविल्यानुसार तहसिलदार, अंबरनाथ यांनी मागणी नोटीस पारित केलेली आहे.

सदर मागणी नोटीस बाबत आय.टी.सी. कंपनी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पीटीशन क्र.८८५८/२०१६ दाखल केली होती. सदर दाव्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे सुनावणी घेण्याबाबत दिनांक २३/०४/२०१६ रोजी आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक १३/११/२०१७ च्या आदेशान्वये आय.टी.सी. कंपनीचे अपिल फेटाळले. सदर आदेशाविरुध्द आय.टी.सी. कंपनीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१४१२३/२०१७ दाखल केली होती. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दि.२२/१२/२०१७ रोजी आदेश पारित केल्यानुसार मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

तसेच, विम्को कंपनीकडून मे.मातोश्री शेल्टर्स इंडीया लि. यांच्याकडे विनापरवाना हस्तांतरीत झालेले एकूण क्षेत्र २२००९ चौ.मी. ही जमीन उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्याकडील दि.१६/०३/२०१६ च्या आदेशान्वये शासन जमा करणेत आली असून सदर मिळकतीबाबत सद्यस्थितीत मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

---

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील अर्बन बँकेजवळील मध्यवर्ती ठिकाणी असलेले महा-ई-सेवा केंद्र बनावट दाखले देत असल्याबाबत

**(३७) ६२६४ (२७-०३-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील अर्बन बँकेजवळील मध्यवर्ती ठिकाणी असलेले महा-ई-सेवा केंद्र चालक श्री.शेख अनेक वर्षापासून चालवित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महा-ई सेवा केंद्राच्या गैरव्यवहार प्रकरणी तेथील नागरीकांनी केलेल्या तक्रारीवरुन या केंद्रावर दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी टाकलेल्या छाप्यात सन २०१४ पासूनचे २५० हून अधिक दाखले जप्त केले असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टाकलेल्या छाप्यामध्ये अर्जदार श्री.माळी व अन्य अर्जदाराना केंद्र चालकाने दिलेल्या दाखल्याची तहसिलदार कार्यालय वा प्रांत कार्यालयात नोंदच नसल्याचेही उघडकीस आले असून या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याकरीता प्रांताधिकारी, जव्हार यांनी महसुली नायब तहसिलदार यांची चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित महा-ई सेवा केंद्राच्या चालकाविरुध्द तसेच त्यांचेशी संगनमत असणाऱ्या संबंधित शासकीय अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) होय, श्री.फिरोज शेख हे जामसर, ता.जव्हार, जि.पालघर येथील महा ई-सेवा केंद्र सन २०१४ पासून चालवत आहेत. उप विभागीय अधिकारी, जव्हार यांचे कार्यालयाकडे दि.२२.०१.२०२० रोजी प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, सहायक जिल्हाधिकारी जव्हार यांनी दि.२३.०१.२०२० रोजी श्री. फिरोज शेख यांच्या महा-ई-सेवा केंद्र, जामसर, जव्हार येथे अचानक भेट देऊन तपासणी केली असता, सदर ई-सेवा केंद्रात एकूण १३ बनावट जातीचे दाखले व ७ बनावट शिक्के आढळून आले. सदरचे बनावट दाखले व बनावट शिक्के पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहेत.

सदर केंद्राची तपासणी करताना अर्जदारांनी जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेले व कार्यवाहीसाठी प्रलंबित असलेले एकूण २१२३ अर्ज आढळून आले आहेत.

सदर प्रकरणी आढळून आलेल्या बनावट दाखले व शिक्यांच्या बाबतीत सहा. जिल्हाधिकारी, जव्हार विभाग, जव्हार यांचेकडील दि.२३.०१.२०२० अन्वये महसूल नायब तहसिलदार जव्हार यांना गुन्हा दाखल करणेकामी प्राधिकृत केले.

श्री.फिरोज शेख यांचे विरुद्ध पोलीस ठाणे जव्हार येथे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम-४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७२, ४७३, ४७४ अन्वये FIR दाखल केला आहे.

सद्यस्थितीत सदर महा ई-सेवा केंद्र बंद (Seal) करण्यात आले आहे.

---

### मौजे मनोरी येथील शासकीय जमिन पोलिस ठाणे बांधण्याकरिता उपलब्ध होणेबाबत

**(३८) ६४८३ (२७-०३-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील बोरिवली - पूर्व येथील गोराई हे पर्यटन स्थळ असून गोराईतील स्थानिक नागरिक व गोराई पर्यटन स्थळाला भेट देणा-या हजारो पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने न.भू.क्र.९८१ सव्हे नं.२५८ मधील १००३.३५ चौ.मी. मौजे मनोरी येथील शासकीय जमिन पोलिस ठाणे बांधण्याकरिता उपलब्ध होणेबाबत सह. पोलिस आयुक्त (प्रशासन) यांच्यामार्फत तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी च्या सुमारास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, बांद्रा, मुंबई यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली , याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२२-०६-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे मनोरी येथील न.भू.क्र.९८१ सर्व्हे नं.२५८ मधील १००३.३५ चौ.मी. शासकीय जमीन गोराई पोलीस ठाणे व स्वच्छतागृहाच्या बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.१४/०२/२०२० च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे सुधारित प्रस्ताव सादर केला आहे. तद्नंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

## मुंबई उपनगरातील कांदिवली पूर्व, चारकोप सेक्टर-६ येथील कायदा व सुव्यवस्थेबाबत

**(३९) ६४८५ (२७-०३-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदिवली-पूर्व, चारकोप सेक्टर-६ येथील कायदा व सुव्यवस्थेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चारकोप, पोलिस ठाणे, कांदिवली (प.), मुंबई यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली व याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२४-०८-२०२०) :** (१) होय.

(२) सदर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीसांनी महाराष्ट्र पोलीस कायदा व मोटार वाहन कायद्यान्वये वेळोवेळी एकूण ४२ विशेष स्थानिक गुन्हे नोंद करुन भादंवि कलम २८५ अन्वये एकूण ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. याप्रमाणे वेळोवेळी पोलीसांमार्फत ठोस कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय सेवकांशी गैरवर्तन प्रकरणी २ वर्षाच्या शिक्षेऐवजी ५ वर्षाच्या शिक्षेस दिलेल्या मंजुरीचा पुनर्विचार करण्याबाबत

**(४०) ६७३० (२७-०३-२०२०). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ या अधिनियमान्वये शासकीय सेवकांशी गैरवर्तन करण्याबाबतच्या गुन्ह्यास २ वर्षाऐवजी ५ वर्षाची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली असुन त्यास शासनाने सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विधानमंडळ सदस्यांना त्यांची लोकांप्रती असलेली कर्तव्य पार पाडण्यासाठी प्राप्त झालेल्या विशेषाधिकारांची कार्यकारी यंत्रणेकडून पायमल्ली होते तसेच शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ अन्वये संरक्षण दिलेले असल्याने शासकीय अधिकाऱ्यांच्या विधिमंडळ सदस्यांप्रती असलेल्या गैरवर्तनात वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कलम ३५३ अन्वये गुन्ह्यास २ वर्षाच्या शिक्षेऐवजी ५ वर्षाच्या शिक्षेस शासनाने दिलेल्या मंजुरीचा पुनर्विचार करून सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली असुन त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाच्या सदस्यांची समिती गठीत करण्याबाबत आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गृह विभागाने समिती गठीत करावी व अधिनियमात योग्य त्या सुधारणा करून नव्याने सुधारणा विधेयक आणावे अशा सूचना अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांना देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गृह विभागाने आजपर्यंत सदर बाबतीत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे राज्यातील प्रशासकीय यंत्रणेकडे न्याय मागण्यास जाणाऱ्या नागरिकांमध्ये व प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये वाद झाल्यास नागरिकांवर कलम ३५३ अन्वये कारवाई केली जात आहे हा अन्याय रोखण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (३१-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) असे आढळून आलेले नाही.

(३) होय.

(४) होय.

(५) तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी विधीमंडळ सभागृहाच्या सदस्यांना आश्वासित केल्यानुसार गृह विभाग, शासन निर्णय क्र.सुधारणा-१०१८/ प्र.क्र.९८/ विशा-९, दि.०५/०१/२०१९ अन्वये भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम-३५३ मधील सुधारणेच्या अनुषंगाने एक समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात टेंभी ते सवना रस्त्यावर जप्त केलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई न केल्याबाबत**

**(४१) ७०६९ (२७-०३-२०२०). श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात नायब तहसिलदार श्री.सयद यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास धडक मोहिम राबवून टेंभी ते सवना रस्त्यावर रेतीने भरलेला एक ट्रॅक्टर ताब्यात घेत पंचनामा करुन कार्यवाही प्रस्तावित केली असतांना पाच दिवसानंतरही दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जप्त केलेले ट्रॅक्टर जप्त केलेल्या ठिकाणाहून गायब झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) नायब तहसिलदार श्री.सय्यद यांनी दि.६/१/२०२० रोजी हिमायतनगर तालुक्यातील मौजे पार्डी ते टेंभी मार्गावर वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर ट्रॉलीसह पकडून व पंचनामा करुन पोलीस पाटील टेंभी यांच्या ताब्यात दिला. तसेच तहसिलदार, हिमायतनगर यांनी दि.७/१/२०२० रोजी सदर वाळूच्या अवैध वाहतूकीच्या प्रकरणी रु.१,१०,८९५/- इतक्या रक्कमेचे दंडात्मक आदेश वाहनधारकास बजाविले.

ट्रॅक्टर धारकाने दंडात्मक रक्कम न भरता पोलीस पाटील, टेंभी यांच्या ताब्यातील ट्रॅक्टर पळवून नेला. त्यामुळे प्रकरणी हिमायतनगर पोलीस ठाणे येथे दि.३/२/२०२० रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील वसई मधील गिरीज येथील सर्वे क्रमांक १४२ या शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याबाबत.**

**(४२) ८९०९ (२९-०५-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई मधील गिरीज येथील सर्वे क्रमांक १४२ या शासकीय जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करून या ठिकाणी असलेल्या तिवरांच्या झाडांची जेसीबी मार्फत कत्तल करण्यात आली असल्याची बाब दिनांक ७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय जागेवरील तिवरांची झाडे तोडून पाणथळ जागेवर भूमाफियांकडून अतिक्रमण होत असल्याबाबतची तक्रार समीर वर्तक, अध्यक्ष पर्यावरण संवर्धन समिती यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान वसईच्या तहसीलदारांकडे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचबरोबर बेकायदा उत्खनन करून पाण्याचा निचरा होण्याचे नैसर्गिक मार्गदेखील बंद केल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आजूबाजूच्या खेड्यापाड्यात शिरून पूरस्थिती निर्माण होण्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार याप्रकरणी भूमाफियांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०८-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे गिरीज, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं.१४२, या खार जमिनीवर तिवरांच्या झाडांची कत्तल करुन अतिक्रमण केल्याबाबत श्री.समीर सुभाष वर्तक समन्वयक पर्यावरण संवर्धन समिती, वसई विरार तसेच तहसिलदार, वसई यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, वसई यांनी चौकशी केली असता सदर जमिनीपैकी सुमारे ०-७०.० हे.आर क्षेत्रावरील तिवरांची झाडांची तोड झाल्याचे तसेच उत्खनन करुन नैसर्गिक खाडीच्या पाण्याचा प्रवाहाचा मार्ग बदलल्याचे निदर्शनास आले आल्याने श्री.जितेंद्र शंकर मेहेर व श्री.घनश्याम सुरत राभर यांचे विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ तसेच भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २६९, ४४७, १८८, ३४ अन्वये वसई पोलीस स्टेशन येथे FIR क्र.०२०४दिनांक ०५.०५.२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विहितगाव बेलतगव्हाण, टाकळी, मनोली, शिंगवे बहुला व सावरगाव (ता.जि.नाशिक) या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी देवस्थानांच्या ताब्यात असल्याबाबत

**(४३) ९१४५ (२९-०५-२०२०). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विहितगाव बेलतगव्हाण, टाकळी, मनोली, शिंगवे बहुला व सावरगाव (ता.जि.नाशिक) या गावांमधील ४४७३ शेतकऱ्यांच्या जमिनी वेगवेगळ्या देवस्थानांच्या ताब्यात असून त्याबाबतची नोंद या जमिनीच्या इनाम वर्ग ३ आणि भोगवटादार वर्ग २ मध्ये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलतगव्हाण शिवारातील जमिनीवर बालाजी देवस्थानाचे नाव असून सन १९७३ च्या शासकीय परिपत्रकाचा आधार घेत देवस्थानाने आपले नाव लावले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यासाठी मिळालेल्या जमिनी शेतसारा नियमाने शासनाकडे अगोदर जमा झाल्या पाहिजे त्यानंतर संबंधित देवस्थानला महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देवस्थानाच्या खर्चासाठी रक्कम मिळू शकते, परंतु मागील पन्नास वर्षात या देवस्थानानी महसूल विभागाकडे निधींची मागणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त शेतकऱ्यांच्या जमिनी या शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-०७-२०२०) :** (१) नाशिक तालुक्यातील विहीतगांव, बेलतगव्हाण, टाकळी, मनोली आणि शिंगवे बहुला, सावरगांव या गावांमधील सुमारे ४४७३ शेतकऱ्यांच्या जमिनी वेगवेगळया देवस्थानच्या ताब्यात नसुन सदरच्या इनाम वर्ग-३ भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी संबंधित शेतकरी तथा वहिवाटदार यांच्या ताब्यात आहे. तसेच सदर जमीनींचा प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट संबंधित शेतकऱ्यांकडेस पुर्वापार चालत आलेली आहे.
(२) होय. बेलतगव्हाण शिवारातील जमिनी बालाजी देवस्थान यांच्या नावे इनाम वर्ग-३ म्हणून दाखल असुन तहसिलदार नाशिक यांचे परिपत्रक दिनांक १६/१०/१९७३ अन्वये अधिकार अभिलेखात वरिष्ठ धारक म्हणून बालाजी देवस्थानाचे नांव दाखल आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे. या गावांमधील शेतसाऱ्याच्या उत्पन्नापैकी काही भाग हा देवस्थानाच्या मागणीनुसार देवस्थानाला देणे अपेक्षित आहे. श्री व्यंकटेश बालाजी संस्थान ट्रस्ट यांना सन १९६१-६२ ते २००१-०२ पावेतो रक्कम रु.१,०४,९०७/- इतका जमीन महसूल देण्यात आलेला आहे. तसेच मौजे विहीतगांव येथे सन १९६०-६१ ते २००१-०२ पर्यत एकुण रु.४४,२२६/- इतका जमीन महसूल दुमालाधारकास/ देवस्थानास देण्यात आलेला आहे. त्यानंतर दोन्ही गावांबाबत देवस्थानांना जमीन महसूल वर्ग केल्याचे दिसुन येत नाही वा देवस्थानांनी सुध्दा मागणी केलेली नाही. मौजे मनोली येथे दिनांक १२/७/१९७६, सन १९८० ते १९८६ या महसूली वर्षामध्ये संस्थांच्या किर्दीस देवस्थानाने महसूल स्विकारलेला आहे. मौजे सावरगांवाचे गंगापुर धरणासाठी भूसंपादन झाल्याने कॅश अलाऊन्स व इतर रक्कम रु.२४,५६४/- देवस्थानाला मिळाल्याबाबत देवस्थानाच्या घटनेमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे.
सदर जमीनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या ताब्यात आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### डहाणू समुद्रकिनाऱ्यावरील वाळू उत्खननाबाबत

**(४४) ९३०६ (२९-०५-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू समुद्रकिनाऱ्यावर वाळू माफियाद्वारे मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन करुन बैलगाडी, लहान टेम्पो व पिकअपमार्फत वाळू चोरी करण्यात येत असल्याने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान डहाणू ग्रामस्थांनी तहसीलदार डहाणू यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने वाळू माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग ३६१ (फ) साठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(४५) ९४३६ (२९-०५-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरवंडी (जि.अहमदनगर) ते ब्राम्हनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी (जि.बीड) राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ साठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे मार्गाचे काम बंद पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूसंपादनासाठी केंद्र सरकारने २९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला असताना केवळ मोजणी भूसंपादन नियंत्रण अधिकारी यांच्या दुर्लक्ष व निष्काळजीपणामुळे शेतकरी मोबाद्ल्यापासून वंचित राहिला असून मार्गाच्या कामास विलंब झाल्यामुळे शासनाला १६ ते १७ कोटीं जास्तीचा खर्च करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) खरवंडी-ब्रम्हनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ (फ) हा अहमदनगर व बीड जिल्हयातून जात आहे. सदर महामार्गासाठी अहमदनगर व बीड या दोन्ही जिल्हयासाठी सक्षम प्राधिकारी हे केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडून दि.३०.१२.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहेत.या महामार्गासाठी अहमदनगर जिल्हयातील ५ गावांचा तर बीड जिल्हयातील ८ गावांचा समावेश आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता,राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून भूसंपादन प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहेत. बीड जिल्हयातील प्राप्त झालेल्या प्रस्तावात संयुक्त मोजणी अहवाल उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३(A) ची प्रसिध्दी दि.१२.०२.२०२० रोजी करण्यात आलेली आहे. सदर प्रसिध्दीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांवर सुनावणी दि.१६.०४.२०२० रोजी ठेवण्यात आलेली होती. परंतु करोना व्हायरसच्या अनुषंगाने संचारबंदी लागू झाल्यामूळे सुनावणी घेता आलेली नाही. तसेच अहमदनगर जिल्हातील प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने संयुक्त मोजणीची प्रक्रिया उपअधीक्षक,भूमी अभिलेख यांच्या

कार्यालयाकडून प्रगतीपथावर आहे. संयुक्त मोजणीची प्रक्रिया पूर्ण करून घेऊन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३(A) ची कार्यवाही चालू आहे. सदर प्रकरणात भूसंपादन कार्यालयाचे स्तरावर विलंब झालेला नसून शासनाचे कोणतेही १६ ते १७ कोटीचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**कृष्णूर सोमठाण (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे अवैधरित्या उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(४६) ९८३८ (०३-०६-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णूर सोमठाण (ता.नायगाव, जि. नांदेड) येथील जमीन गट नंबर १३६५,१३८३,४२५ या दोन ठिकाणाहून मुदखेड-माळ कौठा-गडगा या रस्त्याच्या कामासाठी कोणतीही परवानगी न घेता अधिकाऱ्यांच्या संगणमताने हजारो ब्रास दगड व मुरूमाचे उत्खनन के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीने दिनांक ०४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून मिळालेल्या परवानगी व्यतिरिक्त अतिरिक्त उत्खनन होत असल्याची तक्रार करून संबंधित खदाणीची ई.टी.एस. मोजणी करण्याची मागणी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी, बिलोली यांना ई. टी. एस. तपासणीचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने ई.टी.एस. प्रणालीद्वारे मोजणी करून संबंधित कंपनीवर दंड आकारून महसूल शासनाच्या तिजोरीत जमा करण्याबाबत तसेच संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१), (२) व (३) कृष्णूर सोमठाण (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील जमीन गट नंबर १३६५, १३८३, ४२५ या दोन ठिकाणाहून मुदखेड-माळ कौठा-गडगा या रस्त्याच्या कामासाठी कोणतीही परवानगी न घेता अधिकाऱ्यांच्या संगणमताने हजारो ब्रास दगड व मुरूमाचे उत्खनन के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीने दिनांक ०४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

मौजे सोमठाणा येथील गट क्र.४२१ या ठिकाणाहून के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीला ५०० ब्रास मुरुम उत्खननाकरीता रितसर स्वामीत्वधनाच्या रक्कमेचा आगाऊ भरणा करुन घेतल्यानंतर तात्पुरता गौण खनिज उत्खनन परवाना देण्यात आला आहे.

तसेच मौजे कुष्णूर, ता.नायगाव येथील गट क्र.५९५ मधून के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीला १५,००० ब्रास दगड उत्खननाकरीता रु.६०.९० लक्ष इतक्या स्वामीत्वधनाच्या रक्कमेचा आगाऊ भरणा करुन घेतल्यानंतर तात्पुरता गौण खनिज उत्खनन परवाना देण्यात आला आहे. सदर कंपनीने उक्त ठिकाणाहून केलेल्या दगड उत्खननाची उपविभागीय अधिकारी, बिलोली यांनी दि.२६/११/२०१९ व दि.२७/११/२०१९ रोजी ETS मोजणी केल्यानुसार मंजूर ब्रासपेक्षा अधिक केलेल्या ५५६९ ब्रास दगड उत्खननापोटी स्वामीत्वधनाची रु.२२.६१ लक्ष इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार कंपनीकडून दि.१६/१/२०२० रोजी वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील नदी पात्रातून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत**

**(४७) १००३० (२९-०५-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड, किनवट व माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील नदी नाल्यातून तसेच लिलाव न झालेल्या वाळू घाटातून महसूल विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अवैधरित्या वाळू तस्करी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाळू तस्करीमूळे शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित वाळू तस्करावर व महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१), (२) व (३) मुखेड, किनवट व माहूर या तालुक्यातील वाळूघाटातून तसेच नदीनाल्यातून वाळूच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक तसेच ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल इ.यांचे ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर पथक/समितीमार्फत माहे एप्रिल,२०१९ ते मार्च, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या ४३ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये ४१.८९ लक्ष इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तर २ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच माहे एप्रिल,२०२० ते मे,२०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या १२ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये १०.४२ लक्ष इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तर एका प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळगाव (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील रेतीघाटातून अतिरिक्त उत्खनन केल्याबाबत**

**(४८) १००५७ (२९-०५-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळगाव (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील रेतीघाटातून गट क्र.५, ११४ व १४२ मधून ८४८१ ब्रास रेती उत्खखननाची परवानगी असतांना तब्बल ३४००० ब्रास रेतीचे नियमबाह्य उत्खखनन करून परिसरात अवैध साठा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळगाव रेतीघाटातून ३४००० ब्रास रेती उत्खखन झाले असले तरी नायगाव तहसील कार्यालयाने केवळ १४१०७ ब्रास रेतीचे उत्खनन केल्याचे नमूद करून दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास परवानगी पेक्षा ५६२६.१९ ब्रास रेतीचे उत्खनन केले असल्याचे ई-टी-एस मोजणी अहवालात नमूद केले असल्याने ११ कोटी ७७ लाखांची दंडाची नोटीस लिलाव धारकास बजावली असून सदरहू दंडाची रक्कम शासनाकडे भरणा केली आहे काय,

(३) असल्यास, महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैध रेतीसाठा नियमबाह्य पध्दतीने वैध करून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाची नुकसान केले जात असतानाही त्यांच्यावर कारवाई केली जात नसून यामुळे मोठ्या प्रमाणात शासनाच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून रेती लिलावधारक व संबंधित महसूल अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) मौजे मेळगाव (ता.नायगांव, जि.नांदेड) येथील गट क्र.५,७,१४०,१४१ व १४२ या वाळू गटामधून मंजूर ८४८१ ब्रास परवानगीपेक्षा ५६२६ ब्रास वाळूचे लिलावधारकाने अधिक उत्खनन केल्याचे ईटीएस मोजणीत निदर्शनास आले आहे.

लिलावधारकाने परवानगीपेक्षा ५६२६ जास्त वाळूचे उत्खनन केल्याने पर्यावरण अधिनियम, १९८६ चे कलम १५ अन्वये लिलावधारकाविरुध्द कुंटूर पोलीस ठाणे येथे दि.१९/६/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८(७) व (८) नुसार तहसिलदार, नायगांव (खै) यांनी लिलावधारकास रु.११,७७,८४,२८७/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.३/८/२०१९ रोजी पारित केले असून दंडात्मक रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे. लिलावधारकाने त्याचेशी केलेल्या करारनामा व आदेशातील अटींचे उल्लंघन केल्याने सदर वाळूगटाची अनामत रक्कम रु.२७,२०,७०५/- व बँक गॅरंटी रक्कम रु.७,०२,८७०/- जप्त करण्यात आली असून वाळूगटाचा ताबा परत घेण्यात आला आहे. तसेच लिलावधारकास संपूर्ण राज्याच्या काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा तळेगांव (रघुजी) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील त्रिनेव्हा कंपनीने ब्लास्टिंग केल्यामुळे घरांना तडे गेल्याबाबत**

**(४९) १०१४८ (२९-०५-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा तळेगांव (रघुजी) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे त्रिनेव्हा कंपनीचे गिट्टी क्रशर साठी लागणारे दगड काढण्यासाठी जमीनीत ५० फुटाच्या खोलवर ब्लास्टिंग केल्यामुळे शेजारील गावातील नारिकांच्या घराला तडे गेले असून अनेक जनावरांचा मृत्यु सुध्दा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील गिट्टी खदाणीवर होत असलेल्या ब्लास्टिंगमुळे गावातील नारिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपनीने जमीनीतील दगड व मुरूम काढण्याची कोणतीही परवानगी न घेता प्रमाणापेक्षा जास्त उत्खनन केलेले असल्याने त्याबाबत कंपनीवर दंडात्मक कारवाई केलेली असतांनासुध्दा गिट्टी क्रशर बंद केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ब्लास्टिंगमुळे ज्या नागरिकांच्या घरांना तडे गेले आहेत त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच सदरहू कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) वर्धा-आर्वी या राष्ट्रीय महामार्गाचे बांधकामाकरीता संबंधीत कंपनीस मौजा तळेगाव (रघुजी), ता.आर्वी जि.वर्धा येथील खाजगी जागेतून ७५०० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूकीकरीता तात्पुरता गौण खनिज परवाना मंजूर करण्यात आला आहे. तथापि, सदर कंपनीने परवानगीपेक्षा अधिक गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. परवानगीपेक्षा अधिक उत्खनन केलेल्या गौण खनिजापोटी स्वामित्वधनाची रक्कम संबंधित कंपनीकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्य:स्थितीत सदर खदानीतून गौण खनिजाचे उत्खनन व क्रशर मशीन बंद करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्युअर मेमोरियल हॉस्पिटल, सिताबर्डी नागपूर यांचा जमिनीचा विकास हक्क (टीडीआर) मिळण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५०) १०९३७ (०३-०६-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर विकास आराखड्याअंतर्गत म्युअर मेमोरियल हॉस्पिटल, सिताबर्डी नागपूर यांचा मौजा-सीताबर्डी येथील भूखंड क्रमांक ३०८ या जमिनीचा विकास हक्क (टीडीआर)

मिळण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांचेमार्फत अप्पर मुख्य प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय मुंबई यांना दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) नागपूर शहर विकास आराखड्याअतंर्गत म्युअर मेमोरियल हॉस्पिटल, सिताबर्डी नागपूर यांचा मौजा- सीताबर्डी येथील भूखंड क्रमांक ३०८ या जमिनीचा विकास हक्क (टीडीआर) मिळण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये काही त्रुटी असल्याने सदर त्रुटीची पुर्तता करण्याबाबत संबंधीत क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. याबाबतचा त्रुटी पुर्तता अहवाल प्राप्त झाल्यानतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.